

शिवलंका सिंधुदुर्ग

दुर्गदर्शन पुस्तक क्र. ४

श्री. प्रविण वसंतराव भोसले (बी.ई. सिव्हिल)




शिवरायांच्या हाताचा व पायाचा ठसा.



निसर्गातील दुर्मिळ दृश्य-फांदी फुटलेले नारळाचे झाड.

।। सिंधुदुर्ग ।।

'संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग.

गडकोट हेच राज्य, गडकोट म्हणजे राज्याचे मूळ, गडकोट म्हणजे खजिना, गडकोट म्हणजे सैन्याचे मूळ, गडकोट म्हणजे राज्य लक्ष्मी, गडकोट म्हणजे आपले प्राणसंरक्षण.'

(आज्ञापत्र – रामचंद्रपंत अमात्य)

''जैसा कुळंबी शेतास माळा घालून शेत राखतो, तसे किल्ले राज्यास रक्षण आहेत. तारवांस (नावेस) खिळे मारुन बळकट करतात, तशी राज्यास बळकटी किल्ल्यांची आहे. किल्ल्यांच्या योगाने औरंगशहासारख्याची उमर गुजरून जाईल.

आपणास धर्म स्थापना व राज्य संपादन करणे. सर्वांस अन्नाला **लावून, शत्रूप्रवेश न होय, ते किल्ल्यांमुळे होते.** सर्वांचा निर्वाह आणि दिल्लींद्रासारखा शत्रू उरावर आहे. तो आला तरी नवे जुने तीनशे साठ किल्ले हजरतीस आहेत. एक एक किल्ला वर्ष वर्ष लढला, तरी तीनशे साठ वर्षे पाहिजेत.''

(छत्रपती शिवाजी महाराज)

शिवमुद्रा



बसरुर शहरावर केलेली चढाई मराठ्यांच्या आरमाराचा श्रीगणेशा ठरली.


पाण्यातील या शिवलंकेसाठी महाराजांनी अक्षरशः पाण्यासारखा पैसा खर्च केला. आरमाराचे प्रत्येक अंग बळकट करण्यासाठी स्वराज्यस्थापनेच्या प्रचंड कार्याबरोबरच जाणीवपूर्वक आणि दक्षतापूर्वक पावले उचलली. सिद्दी, इंग्रज, आणि इतर जलचर राजवटींना पायबंद घालण्यात महाराज यशस्वी ठरले म्हणूनच त्यांना 'भारतीय आरमाराचे जनक' म्हणतात.

महाराजांच्या या आरमारी शक्तीचे महत्व सांगताना रामचंद्रपंत अमात्य आपल्या 'आज्ञापत्र' या ग्रंथात लिहितात,

'आरमार म्हणजे स्वतंत्र एक राज्यांगच आहे.
जैसे ज्यास अश्वबल त्याची पृथ्वी प्रजा आहे.
तद्वतच ज्याजवळ आरमार त्याचा समुद्र.
याकरिंता आरमार अवश्यमेव करावे.'

सिद्दी आणि पोर्तुगीजांचे भयानक अत्याचार, जबरदस्तीने होणारी धर्मांतरे, फुटणारी देवळे आणि निरपराध लोकांना अचानक पकडून जहाजांवरुन परदेशात गुलाम म्हणून विकण्यासाठी होणारी रवानगी हा कोकणातील जवळपास नेहमीच होणारा प्रकार म्हणजे सर्वसामान्य प्रजेला पुत्रासमान मानणाऱ्या महाराजांना दिले जाणारे आव्हानच होते. या आव्हानाला महाराजांनी दिलेले अत्यंत अचूक आणि परिणामकारक उत्तर म्हणजे स्वतःचा समुद्री दुर्ग, 'सिंधुदुर्ग' बांधणे.

सह्याद्री, स्वराज्य आणि सागर एकत्रित होते तोपर्यंत स्वराज्यास बाधा नव्हती. परंतु इंग्रजांच्या नादाला लागून पेशव्यांनी १७५६-५७ मध्ये स्वराज्याचे आरमार अक्षरशः जाळून आणि बुडवून संपवले. समुद्राची ताकद दुर्लक्षिली आणि थोडयाच काळात समुद्रावरचे स्वामी इंग्रज भारताच्या भूभागाचे पण स्वामी होऊन बसले. काळाची पावले अगोदरच ओळखून नेहमीच काळाच्या चार पावले पुढे चालणाऱ्या शिवरायांच्या दूरदृष्टीचे, अप्रतिम दुर्गबांधणीचे आणि अष्टावधनाचे प्रतिक असलेला सिंधुदुर्ग आपल्याला शिवरायांची आणखी एक वेगळी ओळख सांगत उभा आहे.



महाद्वार-बाजूच्या दोन बुरूजांनी कवेत घेऊन लपवलेला गोमुखी प्रवेशमार्गाचा हा दरवाजा हे शिवरायांचे दुर्गरचनेतील खास वैशिष्टय.



मोरयाचा धोंडा-हया ठिकाणी पूजा करून व सागराला सोन्याचा नारळ अर्पून शिवरायांनी सिंधुदुर्गाचे बांधकाम सुरू केले.

इतिहास

इसवी सनाच्या अकराव्या बाराव्या शतकात कोकणपट्टीमध्ये अरब व्यापाऱ्यांची ये–जा चालू होती. त्यांनतर पंधराव्या सोळाव्या शतकात निरनिराळ्या युरोपियन राजवटींनी व्यापाराच्या निमित्ताने कोकणात शिरकाव करुन घेतला. व्यापाराबरोबरच सत्ता स्थापण्याची महत्वाकांक्षा बाळगणाऱ्या या इंग्रज, फ्रेंच, डच, पोर्तुगीज इत्यादी व्यापाऱ्यांनी आरमार बाळगले होते. जंजिऱ्याचा सिद्दी हा तर वेळोवेळी वेगवेगळया सुलतानशाहींचा पाठींबा घेऊन कोकणात वाटेल तसा हैदोस घालत होता. जनतेवर भयानक अत्याचार करण्यात या सिद्दीच्या पुढची मजल गोव्याच्या पोर्तुगीजांनी गाठली होती.

जावळीच्या चंद्रराव मोऱ्यांची सत्ता संपवून आणि जावळीचे राज्य ताब्यात घेऊन महाराजांनी स्वराज्याची हद्द समुद्राला भिडवीत आणलीच होती. अफजलखानाला मारुन आणि त्याच्या सैन्याचा फडशा पाडून महाराज तात्काळ आक्रमणास निघाले. देशावर पन्हाळयापर्यंतचा मुलूख काबीज करुन झाल्यावर महाराजांची नजर कोकणाकडे वळली आणि महाराज ससैन्य कोकणात उतरले. आदिलशाहीची ठाणी भराभर काबीज करत आणि आपला अंमल बसवीत महाराज मालवणला आले.

आरमाराच्या सहाय्याने समुद्रावर सत्ता गाजवीत कोकणपट्टीत धुमाकूळ घालणाऱ्या परदेशी सत्तांना उत्तर देण्यासाठी आरमार स्थापण्याची कल्पना महाराजांच्या मनात होतीच आणि मालवणच्या समोरील समुद्रातील 'कुरटे' नावाचे बेट त्याच्या भौगोलिक रचनेने महाराजांना एकदम पसंत पडले. तात्काळ या ठिकाणी नूतन जंजिरा म्हणजे जलदुर्ग वसविण्याचा निर्णय महाराजांनी घेतला आणि नाव ठेवले 'सिंधुदुर्ग'.

पायाभरणी करण्यासाठी महाराजांना हवा असलेला स्थानिक

उपाध्याय परकीय सत्तांच्या भीतीने बोलावून सुद्धा येईना तेव्हा त्याला पकडून आणले. नंतर त्याचा सत्कार करुन आणि संरक्षणाचे आश्वासन देऊन महाराजांनी किनाऱ्यावर मोरयाचा धोंडा या ठिकाणी संकल्प सोडून यथासांग पूजाविधी केला. समुद्राला सोन्याचा नारळ अर्पण करुन सिंधुदुर्गाचे पायाचे चिरे बसवण्यात आले ते शिसाच्या रसात.

हिरोजी इंदुलकर या महाराजांच्या स्थपतीच्या देखरेखीखाली आणि महाराजांच्या सूचनेप्रमाणे सिंधुदुर्गाचे बांधकाम सुरु झाले ते तब्बल तीन वर्षे चालले. या महान उद्योगाला सिद्दी, पोर्तुगीज इत्यादींनी अपशकुन करू नये म्हणून किनाऱ्यावर पाच हजार मावळयांची फौज तैनात करण्यात आली. बांधकामात कुठेही चुकारपणा न होऊ देता आणि १ कोटी होनांचा प्रचंड खर्च करुन ही शिवलंका महाराजांनी उभी केली.

सिंधुदुर्गाचे बांधकाम चालू असतानाच महाराजांनी पहिली नाविक मोहीम काढून कर्नाटकातील बिदनूर संस्थानातील बसरूर या किनारपट्टीच्या गावावर समुद्रमार्गे पहिली स्वारी केली. प्राचीन हिंदुस्थानच्या समुद्र विजयानंतर जवळपास सातशे वर्षांनी सिंधुबंदीची धर्माज्ञा, नव्हे अंधश्रध्द रुढी, महाराजांनी समुद्रात बुडवून टाकली.

यानंतर पुरंदरच्या तहातील अटीप्रमाणे महाराजांना आग्रा येथे औरंगजेबाच्या भेटीस जावे लागले. कपटी औरंगजेबाची कैद करुन जिवे मारण्याची चाल, विलक्षण चातुर्याने सुटका करुन घेऊन महाराजांनी उधळून लावली. या सर्व घडामोडी घडत असताना सुद्धा सिंधुदुर्गाचे बांधकाम चालूच होते. २९ मार्च १६६७ मधे बांधकाम संपताच झालेल्या समारंभात शिवराय स्वतः उपस्थित होते. सिंधुदुर्गाच्या जोडीनेच कुलाबा, खांदेरी, सुवर्णदुर्ग, विजयदुर्ग इत्यादी किल्ल्यांनी स्वराज्याची ही समुद्राकडील तटबंदी तयार झाली. सिद्दी, पोर्तुगीज आणि इंग्रज यांच्या मुक्त संचाराला आणि अत्याचाराला हा कायमचा पायबंद महाराजांनी




शिवराजेश्वर मंदिरातील श्रीशिवरायांची मूर्ती.
ही मूर्ती छ. राजारामांनी 1695 साली स्थापली.



भगवती मंदिरातील श्रीभगवती देवीची मूर्ती.



पश्चिमेकडे नजर ठेवणारा निशाण बुरूज.



साडेतीनशे वर्षे सिंधुदुर्ग असा लाटांशी झुंजत ऊभा आहे.

घातला. सिंधुदुर्गाबरोबरच उभारलेले पद्मकोट, राजकोट आणि सर्जेकोट हे छोटे किल्ले म्हणजे सिंधुदुर्गाचे किनाऱ्यावरील पहारेकरीच होते.

महाराजांच्या मृत्यूनंतर औरंगजेब स्वतः प्रचंड सैन्य घेऊन दक्षिणेत आला. जंजिऱ्याच्या सिद्दीने परत आपल्या उचापती नवीन जोमाने चालू केल्या. पोर्तुगिजांनी आपला जुना धर्मछळाचा खेळ चालू केला. पण त्याच सिंधुदुर्गाच्या सहाय्याने आणि विलक्षण पराक्रमाने छत्रपती संभाजी महाराजांनी या सर्वांना जागेवर गप्प बसवले.

छत्रपती राजाराम महाराजांच्या कारकीर्दीत स्वराज्यातील इतर किल्ले औरंगजेबाच्या ताब्यात जात असतानासुद्धा सिंधुदुर्ग मात्र अजिंक्यच राहीला.

सिंधुदुर्गाचा पुढील इतिहास म्हणजे कान्होजी आंग्रे आणि त्यांच्या वंशजांनी समुद्रावर बसवलेला जबरदस्त धाक सर्व सागरी सत्तांपेक्षा मराठी आरमार बलाढ्य करुन त्यांना समुद्रावर फिरण्यास 'दस्तक' म्हणजे मराठयांची परवानगी घ्यायला भाग पाडणारे आंग्रे घराणे आरमाराला सर्वोच्च स्थानी घेऊन गेले.

स्वामिनिष्ठ आंग्रे स्वतःची स्वतंत्रच सत्ता समुद्रावर स्थापन करतील या केवळ शंकेने भयभीत झालेल्या पेशव्यांनी इंग्रजांशी संगनमत करुन मराठयांचे हे पराक्रमी आरमार नष्ट केले आणि भारताच्या पारतंत्र्याची वाटच जणू मोकळी करुन दिली.

छत्रपती शाहूराजांच्या काळात तहात हा किल्ला कोल्हापूरकर छत्रपतींच्या ताब्यात आला.

इंग्रज आणि छत्रपतींच्या लढ्यात आणि तहात कधी किल्ला इंग्रजांकडे तर कधी छत्रपतींकडे हस्तांतरीत होत राहिला.

१८१२ मधे इंग्रजांनी हा किल्ला शेवटचा ताब्यात घेतला आणि नंतर इंग्रज अमदानीतील प्रसिद्ध समाज सुधारक, शैक्षणिक सुधारणा

घडवून आणणारे कोल्हापूरकर छत्रपती शाहूमहाराज हे किल्याच्या व्यवस्थेकडे लक्ष देत होते. त्यांनीच करवीर दरबारच्या खर्चाने शिवराजेश्वर मंदिरासमारील सभामंडप बांधला.

भारताचे पारतंत्र्य निदान काही काळ तरी पुढे ढकलण्यास कारणीभूत झालेल्या मराठी आरमाराचा हा कंठमणी आज आपल्याला हा सर्व इतिहास अबोलपणे सांगत उभा आहे.

सिंधुदुर्गाकडे जाण्याचे मार्ग

कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण हे महत्वाचे गाव असल्याने राज्य परिवहन महामंडळ आणि गोव्याच्या कदंब वाहतूक सेवेने मालवण या गावी जाता येते. मुंबई– गोवा राष्ट्रीय महामार्गावरील कसाल या तिठ्यापासून मालवण गावाकडे रस्ता जातो.

मालवण गावातील बोटीच्या धक्क्यावरुन होडी ठरवून होडीने सिंधुदुर्गापर्यंत जावे लागते. पावसाळ्यामध्ये समुद्र खवळलेला असल्याने या दिवसात होडीने जाणे धोकादायक ठरण्याची शक्यता असल्याने सिंधुदुर्गाकडे जाण्याचे धाडस नवख्यांनी करू नये.

दुर्गरचना – स्थापत्य

मालवण गावासमोर भर समुद्रात असलेले हे बेट सिंधुदुर्गाच्या बांधकामासाठी महाराजांनी निवडले. समुद्राकडून मालवणकडे येणाऱ्या पाण्यातील मार्गाखालील अनेक खडक पाण्याखाली बुडलेले असल्याने केवळ माहितगार नावाडीच आजसुद्धा सिंधुदुर्गाकडून मालवणकडे येउ शकतो. या मार्गावरील खडक चुकविण्यासाठी खूपच वेडीवाकडी वळणे घ्यावी लागतात. अगदी नजरेसमोर दिसणारा किल्ला गाठताना सतत नागमोडी आणि उलटसुलट दिशेने होडी सिंधुदुर्गाकडे जाते. मार्गाची ही



पश्चिमेचा ढासळलेला तट- एक कोटी होनांची ही शिवलंका आज जीर्णोध्दाराच्या प्रतीक्षेत आहे.



महाद्वाराच्या आत डाव्या बाजूच्या तटावरील शिवरायांच्या हाताच्या व पायाच्या ठश्यावर बांधलेल्या घुमटया.



श्रीशिवराजेश्वर मंदिर • पुढचा भव्य सभामंडप कोल्हापूरच्या राजर्षी शाहूंनी 1906–07 मध्ये बांधला •



महाद्वाराच्या मागील भागाचे दृश्य. अगदी पुढे पडक्या देवड्या व बाजूला नगारखान्याकडे जाणारा जिना.

बिकटता महाराजांच्या तात्काळ लक्षात आली आणि हे स्थान त्यांनी पराक्र केले.

या बेटाचा दगड म्हणजे कठीण कातळच आहे. दुर्ग बांधणीसाठी बेटाचा माथा सपाट करताना फोडून काढलेल्या दगडांचा, भरीचा वापर तटांसाठी व इतर इमारतींसाठी केला गेला.

दुर्गाची रचना करताना महाद्वार मालवणकडे तोंड करुनच बांधलेले आहे पण प्रवेश करतानाचा मार्ग एकदम काटकोनात वळवून मग दरवाजा बांधलेला आहे. हा मार्ग बाजुनी तट आणि बुरुजांनी बंदिस्त केला म्हणजे जी रचना होत ती म्हणजे गोमुखी बांधणी. त्यामुळे समोरुन दरवाजा दिसत नाही. दुर्गरचनेतील ही खास महाराजांची बांधणी.

पायाचे बांधकाम करताना शिसाच्या रसाचा वापर करुन त्यात चिरे बसवून पाया मजबूत केला आहे. सिंधुदुर्गाच्या बांधकामाकडे महाराज किती गांभीर्याने आणि दक्षतेने पहात होते याचे हे एक उदाहरण.

बेटाच्या सपाटीकरणानंतर कडेकडेने बांधलेला तट १० फूट रुंदीचा आणि ३० फूट उंचीचा चिरेबंदी बांधणीचा आहे. चार–साडेचार किलोमीटर लांबीच्या या तटामध्ये बेचाळीस ठिकाणी असलेले अर्धगोलाकृती बुरुज, टेहेळणी आणि तोफा बुदुकांचा मारा करण्यासाठी, अतिशय मजबुतीने बांधलेले आहेत.


अखंड आणि जागता पहारा करणाऱ्या पाहारेकऱ्यांच्या सोयीसाठी या तटाच्या बांधणीत चाळीसपेक्षा जास्त ठिकाणी वर खाली जाणारे जिने आणि जवळपास चाळीस जागी शौचकूपांची व्यवस्था केलेली आहे.

गोडया पाण्याच्या विहीरी, तलाव, मंदिरे निवासस्थाने, कोठारे इत्यादी इमारती जवळपास दुर्गाच्या मध्यभागी बांधण्याची काळजी घेतली आहे.

पन्नास एकर क्षेत्रफळाचा हा दुर्ग बांधताना घ्यावयाच्या काळजी संबंधाने महाराजांनी त्यांचे बांधकाम विभाग प्रमुख आणि अभियंता हिरोजी इंदुलकर यांना लिहीलेले पत्र महाराज किती दक्षतेने या बांधकामावर लक्ष ठेवत होते हे दर्शविते. महाराज लिहितात, ''आमचे लक्ष सिंधुदुर्गी स्थिरावले असे हे बरे जाणणे. अवघे काम चखोट करणे, माणसे नवी आहेती. त्यास सांभाळोन इत्येकांचा उपेग करोन घेणे. पाया बहुत भला रुंद घेणे, खाली अवघा कातळ तरी वरी थोर इमारत तस्माद दो बाजूस दोन हात जागा सोडोन तर उभारता येई इतकी रुंदी घेणे, तर कोठे रुंद, तर कोठे जाग जागा अरुंद येणेप्रमाणे धरावा लागतो. अनुकूल दिसेल त्या प्रमाणे करणे. पायात ओतण्यापायी शिसे धाडायचे व्यवस्था केली असे. नीट पाहोन, मोजोन, माल ताब्यात घेणे. टोपीकर साहूकार लबाड जात. डोळीयातील काजळ चोरून नेतील. पत्ता लागो देणार नाहीत. पुनःत्परतोन त्या कामाचा रोजमुरा मागतील. सावध असणे. गोडे पाणी हाताशी बहुत. पाण्याच्या ठावापाशी टाक्या बांधोन त्यात वाळू साठवणे. गोडया पाण्यामध्ये चार दोनदा भिजू देणे. खारटाण धुतले जाईल. ती धुतलेली वापरणे. चुनखडी घाटावरोन पाठवीत असो. बरी तपासोन घेत जाणे. मिसळ असणार नाही. तरी सावध असणे उत्तम. रोजमुरा हररोज देणे जाणे, त्यास किमपि प्रश्नच न देणे.''

पश्चिमेकडील तटबंदीमधून जाणारा एक मार्ग लहान दरवाज्यातून थेट एका छोटयाश्या पुळणीवर येतो. ही 'राणीची वेळा' या नावाने ओळखली जाणारी जागा तिन्ही बाजूंनी तटांनी बंदिस्त आहे. फक्त समुद्राच्या दिशेचा भाग उघडा आहे. खाजगी समुद्रस्नानासाठीच या भागाची रचना केली आहे.

सिंधुदुर्गाच्या स्थान निश्चितीपासून ते दुर्गाची एकंदर रचना, तट व बुरुजांची भक्कम बांधणी, शिसाच्या रसात पायाचे चिरे बसविणे, पहारा



हया दक्षिण तटबंदीतील तळात पडलेल्या खिंडारातून समुद्राचे पाणी किल्ल्यात शिरत आहे.



महादरवाज्याच्या ऊजवीकडील बुरूजावरून दिसणारा धक्का व दारावरील नगारखाना.

अखंडजागता ठेवण्याची व्यवस्था, गोमुखी प्रवेशद्वार, खाजगी समुद्रस्नानाची व्यवस्था, यात स्वतः महाराजांनी घातलेले लक्ष व केलेल्या सूचना, गिरिदुर्गाबरोबरच जलदुर्ग बांधणीमध्ये सुद्धा महाराजांचे बांधकाम कौशल्य किती उच्च प्रतीचे होते हे दाखवितात.

सिंधुदुर्गाच्यासमोरील पद्मकोट, किनाऱ्यावरील राजकोट आणि सर्जेकोट हे किल्ले सिंधुदुर्गाचे जणू थोडया अंतरावरील पहारेकरीच आहेत. जमिनीबरोबर सिंधुदुर्गाचा संपर्क ठेवणारे हे किल्ले म्हणजे सिंधुदुर्गाच्या संरक्षण व्यवस्थेची सर्वात बाहेरची फळी होती.


दुर्गवर्णन

सिंधुदुर्गाच्या धक्क्यावर उतरताच तटबंदीच्या मधील वळणदार मार्गाने आपण महाद्वारासमोर येतो. बाहेरुन कुठल्याही दिशेने नजरेस न येणारे हे भव्य प्रवेशद्वार माथ्यावर नगारखाना घेऊन उभे आहे. प्रवेशद्वारावर नगारखाना असणे हे किल्ल्याच्या बाबतीत फार कमी ठिकाणी दृष्टीस पडते. प्रवेशद्वारातच हनुमानाचे मंदिर आहे.

आत प्रवेश करताच दोन्ही बाजूंनी वळणे घेत गेलेली तटबंदी वरुन फिरण्याएवढी प्रशस्त आहे पण काही ठिकाणी ढासळलेली असल्याने तटावरुन किल्ल्याला प्रदक्षिण घालायची म्हणले तर बऱ्याच ठिकाणी खाली उतरुन परत तटावर चढावे लागते. पण ही प्रदक्षिणा सर्व किल्ला आणि बाहेरील मालवण गाव, पदमकोट आणि अफाट समुद्राचे पूर्ण दर्शन घडविते.


शिवाय या तटावर चढण्याच्या मार्गावरच प्रवेशद्वाराच्या आतील अंगाच्या उजवीकडे शिवरायांच्या उजव्या हाताचा ठसा वरील देवळीत तर डाव्या पायाचा ठसा खालव्या देवळीत चुन्यात उमटलेला आहे. बांधकाम चालू असताना शिवराय तटावर चढून जात असताना उमटलेले

सिंधुदुर्गचा नकाशा
(ढोबळ रेखांकन)




1–लपवलेले महाद्वार, 2–हनुमान मंदिर, 3–शिवरायांच्या पायाचा ठसा, 4–शिवरायांच्या हाताचा ठसा, 5–दोन फांद्या फुटलेले नारळाचे झाड, 6–शिवराजेश्वर मंदिर, 7–शाळा, 8–महापुरुष मंदिर, 9–राणीची वेळा, 10–महादेव मंदिर, 11–साखरबाव, 12–तलाव, 13 निशाण बुरुज, 14–दहीबाव, 15–दुधबाव,


16–राजवाडा,
17–भगवती मंदिर,
18–जिना, 19–जरीमरी मंदिर, 20–ढासळलेला तट



महादेव मंदिरासमोरील विहिर.



दूधबाव-गोडया पाण्याची विहिर.



ऊत्तरेकडील तटाशेजारील महापुरूष मंदिराजवळच्या या बांधीव तलावाचे पाणी खराब झालेले आहे.

हे ठसे वर घुमटया बांधून जतन करुन ठेवलेले आहेत. या घुमटयांना दरवाजे नसल्याने पर्यटक या ठश्यामध्ये आपला हात आणि पाय ठेऊन बघतात ही मात्र अत्यंत वाईट गोष्ट आहे. असेच चालू राहिले तर हे ठसे नष्ट व्हायला किती वेळ लागणार?

दारातून आत आलेला मार्ग आपल्याला किल्ल्याच्या अंतर्भागात घेऊन जातो. शिवराजेश्वर मंदिराकडे जाताना डाव्या बाजूला दोन फांद्या फुटलेले नारळाचे झाड हे निसर्गातील अत्यंत दुर्मिळ नमुना आहे.

छत्रपती राजाराम महाराजांनी बांधलेल्या या शिवाजी मंदिरात छत्रपती शिवरायांची नावाडयाच्या वेशातील बिनदाढीची मूर्ती आहे. मूर्तीच्या डाव्या उजव्याबाजूस सूर्यचंद्राबरोबरच वल्ही कोरलेली आहेत.

मंदिराशेजारी सिंधुदुर्गावरील वस्तीतील मुलांसाठी शाळा आहे. मंदिराकडून भगवती मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावर दहीबाव व दूधबाव हया गोडया पाण्याच्या विहीरी आहेत. जातानाच लागणाऱ्या महादेव मंदिरावरुन जाणारा रस्ता साखरबाव आणि पुढे निशाण बुरुजाकडे जातो.

टेहाळणी साठी बांधलेल्या या बुरुजाशेजारी एक तलाव बांधलेला आहे पण काळाच्या ओघात आता हा कोरडा पडलेला आपल्याला दिसतो.

भगवती मंदिराशेजारील राजवाडयाचे अवशेष आता फक्त चौथऱ्याच्या रुपाने अस्तित्वात आहेत.

किल्ला म्हटले की असणारी दारुकोठारे, धान्यकोठारे, सैनिकांची निवासस्थाने, कचेरी , किल्लेदाराचा वाडा, तालीमखाना इत्यादी इमारती पडझडीमुळे आणि वाढलेल्या झुडूपांमुळे नजरेस पडतच नाहीत.

शिवराजेश्वर मंदिराच्या मागे जाणाऱ्या मार्गावर तलावाशेजारी महापुरुषाचे मंदिर आहे. तटातून कढलेल्या एका लहान दरवाज्यातून आपण पश्चिमेस असणाऱ्या राणीची वेळा या पुळणीवर पोहोचतो.

सिंधुदुर्गावर पूर्वापार राहणाऱ्या लोकांची वस्ती आहे. शिवराजेश्वर मंदिरात रोजच्या रोज पूजा चालू असते. छत्रपती राजाराम महाराजांनी बांधलेल्या मूळ मंदिरासमोर कोल्हापूरकर शाहू महाराजांनी सभामंडप बांधलेला आहे.

समुद्राने वेढलेल्या या बेटावर गोडया पाण्याच्या विहीरी असणे ही एक आश्चर्याची गोष्ट. पण त्यामुळेच किल्ला सर्व बाबतीत स्वयंपूर्ण होता. हया विहीरी आकाराने लहान असून व्यवस्थितरीतीने बांधलेल्या आहेत.

सर्व बेट बांधकामासाठी सपाट केल्याने टेहळणी साठी एका उंच बुरुजाची गरज होतीच. ही गरज निशाण बुरुज बांधून पूर्ण केलेली आहे. निशाण बुरुजावरुन किल्ल्याचा आणि समुद्राचा सर्व परिसर नजरेस येतो.

राणीची वेळा हे ठिकाण तीन बाजूंनी तटाने बंदिस्त असल्याने खास व्यक्तींना समुद्र स्नानाचा आनंद लुटण्याबरोबरच आवश्यक तो एकांत सुद्धा मिळवून देते.

पश्चिमेकडील तटबंदीचा बराच मोठा भाग पूर्णपणे ढासळला आहे. किल्ल्यावर वाढणारी झाडी हळूहळू पण निश्चितपणे या चिरेबंदी किल्ल्याचे आयुष्य कमी करीत आहे.

झाडी काढून टाकणे, समुद्राच्या बाजुला लाटांचा मारा थोपविण्यासाठी दगडधोंडयाची उतरती भर टाकणे, दर्जा भरुन घेणे अशी दुरुस्तीची कामे केली नाहीत तर ज्यांचा वारसा आपण आज अभिमानाने सांगतो त्या आपल्या महान पूर्वजांच्या ऋणातून आपण अंशतः का होईना पण कसे मुक्त होणार?

कालक्रम

जाने. १६६४	–	सूरतेची लूट.
२५ नोव्हें. १६६४	–	पूजा व पायाभरणी.

८फेब्रु वारी १६६५	–	मालवणमधून बसरुरवर आरमारी स्वारी.
मार्च १६६६ ते ऑगस्ट १६६६	–	महाराजांचे आग्र्याकडे प्रयाण, औरंगजेबाच्या कैदेत आणि कैदेतून निसटून परत महाराष्ट्रात. हया काळात सिंधुदुर्गाचे बांधकाम सुरुच होते.
डिसेंबर १६६४	–	महाराजांनी वेंगुर्ल्याची वखार लुटली. किनाऱ्यावरील ८–१० बंदरे ताब्यात घेतली, सुवर्णदुर्ग बांधकाम.
१६६५ –		आरमार विकासाच्या आड पोर्तुगीज येऊ नयेत म्हणून पोर्तुगीजांशी मैत्रीचा करार.
२९ मार्च १६६७	–	बांधकाम पूर्ण.
१६९७ – १६९९	–	शिवराजेश्वर मंदिर बांधकाम.
१७०८ –		छ. शाहूमहाराज व महाराणी ताराबाई यांच्यातील तहानुसार सिंधुदुर्ग महाराणी ताराबाईंकडे
१७६५	–	दुर्ग इंग्रजांच्या ताब्यात 'फोर्ट ऑगस्टस ' असे नामकरण.
१७६६	–	तहात सिंधुदुर्ग परत मराठ्यांकडे.
१७६३	–	पोर्तुगिजांचे आरमार मालवण व सिंधुदुर्गावर हल्ला करुन परत गेले.
१८०५	–	सावंतवाडीकरांचा सिंधुदुर्गावर अपयशी हल्ला
१८१२	–	सिंधुदूर्ग इंग्रजांनी ताब्यात घेतला.
१९४७	–	गड स्वतंत्र भारतात.

संदर्भ –

१. मराठी रियासत – श्री. गो. स. सरदेसाई
२. राजा शिवछत्रपती – श्री. बाबासाहेब पुरंदरे
३. शिवकालीन राजनीती आणि रणनीती – श्री. श्री. रं. कुलकर्णी
४. राज्य पुरातत्त्व खाते माहिती पुस्तिका
५. भटकंती सह्याद्रीची – श्री. प्र. के. घाणेकर

दुर्गदर्शन मालेतील पुस्तके



पश्चिम बाजूची राणीची वेळा. महाद्वाराखेरीज किल्ल्याबाहेर पडण्याचा हा मार्ग पाण्यात लपलेल्या खडकांमुळे अत्यंत बिकट आहे.



सिंधुदुर्गाची वायव्य दिशेकडील खणखणीत तटबंदी.